# क्षमता आधारित शिक्षण समजून घेताना....



## क्षमता आधारित शिक्षण म्हणजे काय?

क्षमता आधारित शिक्षणात ज्ञान, दृष्टीकोन, कौशल्ये या संदर्भातील मुलांच्या कामगिरीचे निरीक्षण आणि सातत्यपूर्ण मोजमाप केले जाते. मुलांच्या क्षमतांमधील प्रगतीचे मोजमाप करून त्या माहितीच्या विश्लेषणाचा उपयोग शिक्षक वर्ग नियोजनासाठी करतात. त्यामुळे ढोबळ अंदाजापेक्षा हे नियोजन खऱ्या अर्थाने माहिती आधारित होते.

क्षमतांसाठीचे अध्ययन अनुभव मुलांना मिळणे, शिक्षकांनी धडा शिकवून पूर्ण करणे यापेक्षा यात प्रत्येक मुल आपापल्या गतीने त्या त्या क्षमतेमध्ये प्रभूत्व मिळवू शकणे यावर भर दिला जातो. मुलांना एखादी क्षमता प्राप्त झाली हे तेव्हाच म्हणता येऊ शकते जेव्हा त्या क्षमतेचा उपयोग पाठ्यपुस्तक, वर्ग यापलीकडे खऱ्या जीवनात मुलांना करता आला.


## क्षमता आधारित शिक्षण कशासाठी?

प्रत्येक मूल शाळेत टिकलं पाहिजे, शिकलं पाहिजे यासाठी प्रत्येक मुलामुलीच्या शैक्षणिक गरजा, बलस्थाने, आवडीनिवडी याचा विचार करणारी यंत्रणा उभी करण्यासाठी

### राष्ट्रीय शिक्षण धोरणातसुद्धा क्षमतांचे महत्व अधोरेखित केले गेले आहे.

**प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे-** शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि अभ्यासेतर दोन्ही क्षेत्रांमध्ये चालना देणे.

– राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०



**सध्याच्या वर्ग प्रक्रियांबाबत खालील काही निरीक्षणे नोंदवता येतील**

१. पाठ्यक्रम आणि अध्ययन निष्पत्ती पूर्ण कसे करायचे याबाबत संभ्रमावस्था

२. धडे वाचून शिकवणे, सराव देणे, उजळणी घेणे इत्यादी पद्धती वापरून शिकवण्याची प्रक्रिया ही वर्गात सामूहिक पद्धतीने सुरू असते.


३. संकलित चाचण्या हे प्रगतीचे मोजमाप करण्याचे प्रमूख मापक असल्याने गुणात्मक वाढीपेक्षा उपचारात्मक पध्द्तीचा विचार अधिक केला जातो.

या पार्श्वभूमीवर अध्ययन निष्पत्ती साध्य करताना अनेक अडचणी येऊ शकतात. अध्ययन निष्पत्तीची विधाने ही व्यापक विधाने आहेत. मुलांच्या इयत्ता आणि वयाच्या संदर्भात कालबद्ध विचार त्यात आहे. परंतु शिकण्याच्या सातत्यपूर्ण प्रक्रियेमध्ये त्यामुळे अडचण येऊ शकते. प्रत्येक मूल शिकू शकते या दृष्टीने पाहिले असता गरज आहे ती मूल जिथे आहे तिथून त्यांच्या अध्ययन प्रवासाला सुरुवात करण्याची. वर्षाअखेरची ध्येयं यंत्रणा म्हणून आपल्यासाठी महत्त्वाची वाटत असली तरीही मुलांच्या दृष्टिकोनातून प्राधान्य मिळाले पाहिजे ते मूल शिकत असताना योग्य वेळी योग्य ती मदत मिळण्याची.

मुलांच्या वैयक्तिक प्रगतीचा विचार करायचा झाल्यास अध्ययन निष्पत्तीचा जसाच्या तसा विचार वर्ग नियोजनात करता येत नाही. त्यासाठी त्या निष्पत्ती किंवा धड्यातून अपेक्षित क्षमता शोधाव्या लागतील. अशा स्पष्ट आणि नेमक्या स्वरूपात मांडलेल्या क्षमतांचा विचार करून वर्गातील प्रत्येक मुलामुलीसाठी नियोजन केले तर ते अधिक प्रभावी ठरते. कारण त्यामुळे प्रत्येक मुलामुलीची प्रगती क्षमता निहाय मापता येते.

क्षमता विकासनाचा दृष्टिकोन हा पुढील शिक्षणासाठीची पायाभरणी करणारा ठरतो. मुलं शिकली हे खऱ्या अर्थाने आपण तेव्हाच म्हणू शकतो जेव्हा मुलांमध्ये अशी काही मूलभूत कौशल्ये विकसित होत जातील ज्याचा उपयोग मुलं कोणत्याही परिस्थितीत करू शकतील.

निपुण भारत मिशन मध्ये सुद्धा क्षमताआधारित शिक्षणाकडे वळण्याचे महत्व विशद केले गेले आहे.


NIPUN BHARAT

## 4.1 Learning Outcomes and Competencies

Learning outcomes are statements that describe the knowledge, skills and attitudes, students should acquire by the end of a particular assignment, class, course, or program, and help students understand why that knowledge and those skills will be useful to them. The combination of knowledge, skills, attitudes, and values form the competencies that are expected to be developed in everyone. They focus on the context and potential applications of knowledge and skills, help students connect learning in various contexts, and help guide assessment and evaluation. In competency-based education, teaching and learning focuses on acquiring these basic competencies which can be measured through learning Outcomes.

The National Council of Educational Research and Training (NCERT) developed "Learning Outcomes (LOs) at the Elementary Stage" in 2017[9] for each class and subject. These learning outcomes were the result of wide consultations and field trial in different types of schools located in different parts of the country. In continuation, learning outcomes for the secondary stage[10] have also been developed in 2019. These are expected learning achievements which are spelt class-wise. These learning outcomes are not suggested in hierarchical manner. Learners can achieve these learning outcomes at their own pace and skills. Teachers are provided with pedagogical and assessment inputs to follow process-oriented methods of achieving the stated LOs. They can design and provide a variety of learning situations/opportunities as per the needs of different learners in an inclusive classroom. These LOs have served as guiding points for the teachers and the stakeholders and are being used widely to assess the progress of learning of children in different classrooms.


## 4.2 Importance of Competency Based Learning

**a. Unique Experiences of Children:**

Children come to school from different backgrounds and contexts-some children have parents and adults in the family who engage with them-play, tell stories, provide interactive language experiences, provide safety, connections, and high-quality routines, which are enriching and interesting for children. On the other hand, there are children who have experienced less engaging and enriching early childhood years, without secure attachments, safety and connection, good nutrition, and rest,

[9] Learning Outcomes at Elementary Stage, https://ncert.nic.in/pdf/publication/otherpublications/tilops101.pdf
[10] Learning Outcomes at Secondary Stage Stage https://ncert.nic.in/pdf/publication/otherpublications/learning_outcomes.pdf




and without enriched learning opportunities. As a result, children have differences in readiness for school when they begin preschool or kindergarten. Additionally, children in the same class might have a 12-month age difference. There are differences in the levels of language skills, visual-motor skills, and social readiness. Children having varied levels of oral language development, second language learners, diversity in home atmosphere may result in different types of learners having different learning needs.

**b. Competency Based Learning:**

When children from diverse backgrounds having different learning, needs enter the formal school, all of them are expected to be ready for grade-level content to be covered and tested in a time-limited learning system. In many schools in India, children are offered non-responsive instruction which does not serve their learning needs, but focus is on completing the syllabus without monitoring what children are learning. One-size-fits-all instruction and testing quickly classifies children into winners and losers. By the end of third grade, children have settled into patterns of learning that usually persist for life. An alternative to the traditional learning system is the competency-based learning. Competency based learning is focused on student learning outcomes, and is characterized by the following:

- Explicit and measurable learning outcomes are defined which are the pathways for competency acquisition.
- The pedagogy is based on activities, experiences, integration of arts/sports/technology, etc. and connecting the learnings to real-life situations, so that child learns to apply knowledge.
- Children advance to the next level of learning outcomes only upon achieving certain level of proficiency at the current level[11].
- Primarily formative assessment is used, and skills or concepts are assessed in multiple contexts to ensure that both deep understanding and applications are acquired by children.

[11] World Class – How to build a 21st century school system; by Andreas Schleicher, published by OECD page 67-68, "Mastery learning builds on the understanding that learning is sequential, and that mastery of earlier tasks is the foundation on which mastery of subsequent tasks is built. According to American psychologist John Carroll, student learning outcomes reflect the amount of time and instruction a student needs to learn, and whether the opportunity to learn and quality of instruction are sufficient to meet students' needs. For teachers, that means that they do not vary the learning goals, which hold for the entire class, but that they do whatever is needed to ensure that each student has the opportunity to learn the material in ways that are appropriate to him or her. Some students will require additional instruction time, others will not; some students will require different learning environments than others. Behind this thinking is the deep belief that all students can learn and succeed, and that the task of teachers is to design the learning environments, whether inside or outside the classroom, that help students realise their potential."

## प्रभावी क्षमता आधारित शिक्षण कसे दिसते?

१. शिकण्याच्या प्रक्रियेचा भाग असणाऱ्या प्रत्येक मुलामुलीला – खात्रीशीररित्या त्या त्या क्षमता प्राप्त झालेल्या असतात.

२. क्षमता विकसनासाठी पाठ्यक्रमाच्या पलीकडे मुलं अध्ययन अनुभव घेत असतात.

३. वर्गप्रक्रिया ही अनुभवात्मक आणि कृती युक्त शिक्षण पध्दतीची असते

४. सर्वांची समान पद्धतीने परिक्षा न घेता मुलांच्या प्रगतीचे वैयक्तिक किंवा लहान गटात क्षमता निहाय मूल्यमापन केले जाते.

५. प्रगतीचे मोजमाप राज्य/राष्ट्रीय पातळीपेक्षा वर्ग पातळीवर करण्यावर भर दिला जातो.

## प्रभावी अंमलबजावणीसाठी...

क्षमतांची संरचना, क्षमता निहाय संसाधने आणि मूल्यमापने याबरोबरीनेच क्षमता आधारित शिक्षणाची वर्गात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांचे वर्ग नियोजनही क्षमता आधारित असावे लागेल. यासाठी शिक्षण परिषदेत गट चर्चा, प्रात्याक्षिके झाल्यानंतर शिक्षक खालीलप्रमाणे वर्गातील प्रत्येक मुला-मुलीसाठी क्षमतानिहाय नियोजन करू शकतात.

**शाळा-** | **महिना -**

**शिक्षकाचे नाव -** | **आठवडा - १**

**विषय -** | **वर्ग -**

| अ. क्र. | अध्ययन निष्पत्ती क्रमांक | महिन्यासाठी निश्चित केलेल्या अध्ययन निष्पत्तीचे विधान | अध्ययन निष्पत्तीपूर्ततेतील निवडलेल्या क्षमता | क्षमता प्राप्त होण्यासाठी आवश्यक उपक्रम / अनुभव | क्षमतानिहाय मूल्यमापन | पाठ्यपुस्तक संदर्भ | क्षमताआधारित मदतीची गरज असणारी मुले | निरीक्षणात्मक नोंदी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**शिक्षण परिषदेमध्ये गटचर्चा करून शिक्षकांनी ही माहिती भरावयाची आहे.**

**ही माहिती शिक्षक शिक्षण परिषदे नंतर वैयक्तिकपणे भरतील.**



या प्रक्रियेत क्षमता निहाय मूल्यमापनाचे आत्यंतिक महत्त्व आहे. हे मूल्यमापन मुल काय शिकले याबाबतचे न राहता मुलांना पुढे काय शिकवायचे आहे हे समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरते. त्याबाबतच्या शिक्षकांच्या गरजा केंद्रपातळीवर सोडवण्यासाठी, तालुका-जिल्हा-राज्य पातळीवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठीही या मुल्यमापनाच्या विश्लेषणाची मदत होऊ शकते.

## क्षमता आधारित शिक्षणपद्धतीतील वर्ग कसा दिसतो?

- प्रत्येक मुल वेगळे असल्याची जागरूकता असते.
- मुल केंद्रित वर्गप्रक्रिया असते.
- सातत्यपूर्ण अभिप्राय आणि मननातून शिकण्यास मुलांना संधी मिळते.
- मुलांच्या अध्ययन स्थितीच्या माहितीचा वर्ग नियोजनासाठी उपयोग.
- क्षमता आणि कौशल्ये प्राप्त होण्यावर भर.
- पालक आणि मुलांना शैक्षणिक ध्येयाबाबत अधिक स्पष्टता.









gyan prakash
FOUNDATION
**ग्यानप्रकाश फाउंडेशन**
३०२, 'ऑर्चर्ड' डॉ. पै. मार्ग, बाणेर,
पुणे - ४११०४५
इमेल - admin@gyanprakash.org